# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 17.06.2024** **वारः सोमवार**

---

१. दहशतवादाला त्वरित प्रत्युत्तर देण्यासाठी सर्व सुरक्षा यंत्रणांनी एकमेकांच्या समन्वयानं युद्धपातळीवर काम करावं – केंद्रिय गृहमंत्र्यांचे निर्देश,
२. आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रिय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाची जनजागृती मोहीम,
३. मक्का इथं धार्मिक विधी सुरू असताना १४ भाविकांचा मृत्यू,१७ जण बेपत्ता,
४. बंगळुरू इथं झालेल्या महिलांच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, भारतीय संघाचा दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय,
आणि
५. सिक्कीममध्ये अद्यापही अडकलेल्या बाराशे पर्यटकांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू.

**शहा-बैठक**
नवनव्या उपाययोजनांद्वारे दहशतवादाचा संपूर्ण नायनाट करण्याबाबतचं उदाहरण घालून देण्यास केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. शहा यांनी काल नवी दिल्लीत जम्मू आणि काश्मीरमधल्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. दहशतवादाला त्वरित प्रत्युत्तर देण्यासाठी सर्व सुरक्षा यंत्रणांनी एकमेकांच्या समन्वयानं युद्धपातळीवर काम करावं असे आदेश त्यांनी या आढावा बैठकीत दिले. जम्मू काश्मीरमधला दहशतवादाच्या विरोधातला लढा आता निर्णायक पातळीवर आला आहे. दहशतवाद्यांचा अत्यंत सुनियोजित हिंसाचार आता कमी झाला असून दहशतवादी कृत्यं केवळ लुटुपुटूच्या लढाईवर आली आहेत असं नुकत्याच घडलेल्या काही घटनांवरुन दिसून येतं असं शहा म्हणाले. दहशतवादी कारवाया होण्याची शक्यता असलेली ठिकाणं ओळखून तिथल्या सुरक्षा व्यवस्थेवर अधिक लक्ष द्यावं असं केंद्रिय गृहमंत्र्यांनी सुचवलं.

**रिजिजू-खडगेभेट**
केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी काल कॉंग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांची भेट घेतली. संसदेच्या आगामी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही भेट घेण्यात आली.या अधिवेशनात सर्व पक्षांनी मिळून देशाच्या विकासासाठी काम करू असं प्रतिपादन उभय नेत्यांनी या भेटीत केलं. १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ जून पासून सुरू होणार असून ते ३ जुलै पर्यन्त चालेल. या अधिवेशनात नवीन सदस्यांचा शपथविधी तसंच नवीन अध्यक्षांची निवड करण्यात येणार आहे.

**डीप-सी-मिशन**
लवकरच स्वतःचं समुद्रतळ अभियान असलेला जगातला सहावा देश होण्यास भारत सज्ज आहे, अशी माहिती भूविज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी दिली आहे. भूविज्ञान मंत्रालयाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्यावर चर्चा करण्यासाठी सिंग यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत एक बैठक झाली. या बैठकीत सिंग यांनी समुद्रतळ अभियानाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केलं. समुद्रतळ अभियानात यश मिळवणाऱ्या मोजक्या देशांमध्ये भारताची गणना होणार असल्याबद्दल अभिमान वाटत असल्याचं सिंग यावेळी म्हणाले.

**अग्निपथयोजना**
केंद्र सरकारने काल, ‘अग्निपथ योजना’ काही बदलांसह पुन्हा सुरू करण्याचं वृत्त फेटाळून लावत असा कोणताही निर्णय घेतला नसल्याचं स्पष्ट केलं आहे.तसंच, समाजमाध्यमांवर फिरत असलेले संदेश दिशाभूल करणारे आणि बनावट असल्याचं म्हटलं आहे. अग्निपथ योजना, ‘सैनिक सन्मान योजना’या नव्या रूपात राबवण्यात येणार असून, सेवेचा कालावधी वाढवून७ वर्षांचा करण्यात येणार असून, वेतनातही वाढ केली असल्याचं दावा या बनावट संदेशांत करण्यात आला होता, मात्र, असा कोणताही बदल या योजनेत केला गेला नसल्याचं, पत्रसूचना कार्यालयाने, आपल्या एक्स हॅंडल वरील संदेशातून स्पष्ट केलं आहे.

**एनटीए**

यंदाच्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीटमधील अनियमिततेसाठी जबाबदार असल्याचं आढळल्यास, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही, असं केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल स्पष्ट केलं. गैरप्रकाराच्या चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तींना शिक्षा केली जाईल असं आश्वासन सिंग त्यांनी ओडिशातल्या संबलपूर इथं माध्यमांशी बोलताना दिलं.

**आर्थिक**

देशातल्या आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन केंद्रिय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ अर्थात सीबीआयसी नं विविध माध्यमातून जनजागृती मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत अशा फसवणुकीच्या घटनांपासून सावध राहण्यासाठी वर्तमानपत्रं, मोबाईल संदेश, इ-मेल्स आणि समाजमाध्यमांद्वारे नागरिकांना सूचना देण्यात येत आहेत. सीमाशुल्क अधिकारी असल्याचं सांगून प्रामुख्यानं दूरध्वनी करुन किंवा एसएमएसच्या माध्यमातून लोकांना शिक्षेची भिती दाखवून त्यांच्या खात्यातून पैसे काढण्याचे प्रकार घडत आहेत. लोकांनी अशा दूरध्वनी अथवा एसएमएसकडे लक्ष देऊ नये, स्वतःची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवावी, असे दूरध्वनी करणाऱ्यांबाबत माहिती देऊन त्यांची तक्रार करावी आणि सतर्क राहावं असं आवाहन सीबीआयसी नं केलं आहे.

**अमरनाथ-हेलिकॉप्टरनोंदणी**

येत्या २९ जून पासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी हेलिकॉप्टर सुविधेच्या नोंदणीला प्रारंभ करण्यात आला आहे. बालतालआणि पहालगाम या दोन्ही ठिकाणांवर ही सुविधाउपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरनाथ यात्रेच्या JKSASB.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरून यासाठी नोंदणी करण्यात येईल.

**हाजयात्रा**

सौदी अरबमधील मुस्लिमांचं पवित्र धर्मस्थळ मक्का इथे, ईद निमित्त धार्मिक विधी सुरू असताना १४ भाविकांचा मृत्यू झाला असून, १७ अन्य बेपत्ता झाल्याचं, जॉर्डनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते सुफयान कुदाह यांनी एका निवेदनात म्हंटलं आहे. प्राथमिक अंदाजानुसार असह्य उष्माघातामुळे हे मृत्यू झाले असावेत. बेपत्ता १७ भविकांचा शोध घेण्यात येत असल्याचंही या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

**रशिया-युक्रेन**

रशिया युक्रेन संघर्षावर चर्चा आणि राजकीय धोरणांद्वारे कायमस्वरुपी शांततापूर्ण तोडगा काढण्यावर भारतानं भर दिला आहे. स्वित्झर्लंड इथं झालेल्या दोन दिवसांच्या युक्रेन शांतता परिषदेत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या पश्चिम विभागाचे सचिव पवन कपूर सहभागी झाले होते. या परिषदेत त्यांनी भारताचा दृष्टीकोन स्पष्ट केला. या परिषदेतल्या विचारविनिमयानंतर प्रकाशित करण्यात आलेल्या कोणत्याही परिपत्रकाबाबत सहमती दर्शवण्यास भारतानं नकार दिला आहे. भारताचा या परिषदेतला सहभाग या संघर्षावर चर्चेतून कायमस्वरुपी, शांततापूर्ण तोडगा काढण्याच्या दृष्टीकोनाला अनुसरुन होता असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**भारत-कंबोडिया**

भारत आणि कंबोडिया यांच्यात कालपासून थेट विमानसेवा सुरू झाली. कंबोडियाचे उपपंतप्रधान नेथ सेवोउन आणि तिथल्या भारतीय राजदूत देवयानी खोब्रागडे यांच्या हस्ते काल या विमानसेवेचं अधिकृत उद्घाटन झालं. या विमानसेवेद्वारे पहिल्या पर्यटन वर्षाची सुरुवात झाली असून यामुळे पर्यटनाला तसंच नागरिकांचा परस्पर संवाद वाढण्याला चालना मिळेल असं भारतीय वकीलातीनं समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**प्रेरणा-स्थळ**

संसदेच्या आवारात नव्यानं उभारण्यात आलेल्या प्रेरणा स्थळाचं उद्घाटन काल राज्यसभेचे अध्यक्ष, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते झालं. संसदेला भेट देण्यासाठी आलेल्या अभ्यागतांना स्वातंत्र्य लढ्यातील योद्धे आणि नेते यांचे पुतळे एकाच ठिकाणी पाहता यावेत अशा पद्धतीने या प्रेरणा स्थळाची रचना करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं या नेत्यांचं जीवन आणि स्वातंत्र्यलढ्यातलं त्यांचं योगदान याविषयीची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्याची व्यवस्था इथे करण्यात आली आहे.

**राष्ट्रपती-ईद**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना इद उल अझा म्हणजेच बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण त्यागाचं प्रतीक आहे. तो प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देतो असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

**T -२० क्रिकेट**

पुरुषांच्या वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल पाकिस्ताननं आयर्लंड संघावर तीन गडी राखून मात केली. पाकिस्तान आणि आयर्लंड हे दोन्ही संघ याआधीच स्पर्धेबाहेर गेले आहेत.

**महिलाक्रिकेट**

बंगळुरू इथे काल झालेल्या महिलांच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिका संघावर १४३ धावांनी विजय मिळवला. भारतीय संघानं आपल्या डावात ८ गडी बाद २६५ धावा केल्या. उपकर्णधार स्मृति मंधानाने १२७ चेंडूंत ११७ धावांची शतकी खेळी केली. २६६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाहुण्या संघाला केवळ १२२ धावा करता आल्या.

**सिक्कीम**

सिक्कीममध्ये अद्यापही सुमारे बाराशे पर्यटक अडकून राहिले आहेत. प्रतिकूल हवामानामुळे काल त्यांची सुटका करता आली नाही. आज हवामानाने साथ दिल्यास, त्यांच्या सुटकेचे प्रयत्न केले जातील असं चुंगथांगचे उपविभागीय दंडाधिकारी किरण थाटल यांनी सांगितलं. अडकलेल्या पर्यटकांना लाचुंग इथे अत्यल्प दरात निवास आणि भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. दरम्यान, राज्याच्या रस्ते आणि पूल विभागाचे मंत्री एन. बि. दहल यांनी पर्यटकांना लवकरात लवकर सुरक्षितस्थली हलवण्याचं आश्वासन दिलं. सिक्कीम मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भू-स्खलन होऊन हजारो पर्यटक अडकून पडले आहेत.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.